# स्विफ्ट व क्रुझरचा अपघात, पाच जण गंभीर जखमी

## नांदगाव - काचुर्णा मार्गावर टेंभणी फाट्याजवळ घटना



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.2 )** - स्विफ्ट डिझायर व क्रुझरच्या अपघातात पाच जण गंभीर जखमी झाले आहे. ही घटना शुक्रवारी (दि.28) बेनोडा पोलिस ठाण्यांतर्गत येणाऱ्या नांदगाव ते काचुर्णा मार्गावर टेंभणी फाट्याजवळ घडली. यशस्वी कैलास देहांते (वय 16), रेखा प्रफुल्ल युवनाते (वय 34), प्रफुल्ल युवनाते (वय 36) व कुसुम शेषराव मेश्राम (वय 43) सर्व रा. रामपुरी, ता. नरखेड, जि. नागपूर अशी अपघातातील गंभीर जखमींची नावे आहेत. जखमींना प्रथम वरुड ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. तेथे प्रथमोपचार करून त्यांना पुढील उपचारासाठी अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवण्यात आले. रामपुरी येथील 10 ते 12 जण क्रुझर गाडी क्रमांक एमएच 21/सी 2668 ने सालबर्डी येथे जात होते. दरम्यान त्याच वेळी नांदगाव ते काचुर्णा मार्गावर टेंभणी फाट्याजवळ वरुडकडून स्विफ्ट कार क्रमांक एमएच 04 एफएफ 5963 येत होती. भरधाव येणाऱ्या गाडीला वाचवण्याच्या प्रयत्नात क्रुझर अनियंत्रित होऊन पलटी झाली. यात कुझरमधील यशस्वी देहांते, रेखा युवनाते, प्रफुल्ल युवनाते व कुसुम शेषराव मेश्राम व स्विफ्टमधील एक महिला असे पाच जण गंभीर जखमी झाले, तर स्विफ्टचा चालक व त्यातील एक पुरुष किरकोळ जखमी झाले. या घटनेचा तपास बेनोडा ठाणेदारांच्या मार्गदर्शनात ललित तायडे करत आहे.

# तुरुंगातून सुटताच मावस भावालाही संपविले

## मसानगंजमध्ये तरुणाची हत्या ■ वैभव पटेरिया हत्याकांडातील मारेकऱ्यांचा प्रताप





**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.2 )** - गेल्या वर्षी 7 ऑक्टोबर 2025 रोजी जुन्या वैमनस्यातून मसानगंजमध्ये भरदिवसा वैभव पटेरिया नामक युवकाची शुभम मोहोड नामक गुन्हेगाराच्या टोळीने हत्या केली होती. यात आपल्या मावस भावाच्या हत्येचा बदला घेण्याची वाच्यता करणाऱ्या युवकाचीही तुरुंगातून सुटलेल्या शुभम मोहोड व त्याच्या टोळीने पाच महिन्यानंतर रविवारी(दि.2) रोजी मसानगंज परिसरातच निर्घुण हत्या केली. या घटनेमूळे मसानगंज परिसर पुन्हा एकदा हादरला आहे. आदर्श राजेश गुप्ता (26, रा. मसानगंज) असे मृताचे नाव आहे. या घटनेनंतर जिल्हा सामान्य रुग्णालयात नातेवाईकांनी प्रचंड आक्रोश केला. तणावाची स्थिती पाहता पोलिसानी अतिरिक्त बंदोबस्त लावून स्थिती हाताळली. आदर्श गुप्ता हा मसानगंज परिसरातील शफीक किराणा दुकानाजवळ उभा असताना, दोन हल्लेखोरांनी आदर्शवर चाकूने हल्ला केला. या घटनेनंतर काही नागरिकांनी आदर्शला रक्तबंबाळ अवस्थेत दुचाकीवर बसवून तत्काळ जिल्हा सामान्य रुग्णालयात आणले. परंतू अधिक रक्तस्त्राव झाल्याने आदर्श गुप्ताचा मृत्यू झाला. या घटनेच्या माहितीवरून आदर्श गुप्ताच्या नातेवाईकांसह मित्र मंडळीने जिल्हा सामान्य रुग्णालयात एकच गर्दी केली. यावेळी रुग्णालय परिसराच प्रचंड आक्रोश पाहायला मिळाला. रुग्णालयात तणावाची स्थिती पाहता पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, एसीपी, कोतवालीचे ठाणेदार मनोहर कोटनाके यांच्यासह क्युआरटी पथक व अतिरिक्त पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. याप्रकणात नागपुरी गेट पोलिसांनी आरोपींचा शोध सुरु केला होता. रात्री उशिरापर्यंत रुग्णालयात परिसरात गोंधळाची स्थिती कायम होती. आदर्श गुप्ताचे वर्षभरापूर्वीच लग्न झाले होते. त्याला एक लहान मुलगी आहे. आदर्शची पत्नी सद्यास माहेरी असून, त्यांना या घटनेची माहिती देण्यात आली.



मृतक आदर्श गुप्ता

### आरोपीच्या घराची तोडफोड

आरोपी हा मसानगंज परिसरातील रहिवासी असून, तो काही दिवसांपूर्वी जेलमधून बाहेर आला आहे. त्याच्याविरुध्द नागपुरी गेट पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाई केली होती. परंतू त्याने जुन्या वैमनस्यातून आदर्श गुप्ताची हत्या केल्याची माहिती पुढे आली आहे. या घटनेनंतर आदर्शच्या नातेवाईकांचा रोष उफाळून आला होता. त्यामुळे काही जणांनी आरोपीच्या घराची तोडफोड केली. त्यामुळे पोलिसांनी मसानगंज परिसरातही कडेकोट बंदोबस्त तैनात केला आहे.

### वैभव पटेरीया चा मावसभाऊ आहे आदर्श


काही महिन्यापूर्वी मसानगंज परिसरात जुन्या वादातून वैभव हुकुमचंद पटेरिया (24, रा. मसानगंज) नामक तरुणाची हत्या करण्यात आली होती. याप्रकरणात पोलिसांनी आरोपींना अटक केली होती. या हत्याकांडातील एक आरोपी काही दिवसांपूर्वीच जेलमधून बाहेर आला. त्यानेच त्याच्या साथीदारासोबत आदर्श गुप्ताची हत्या केल्याची माहिती पुढे आली आहे. आदर्श हा वैभव पटेरियाचा नातेवाईक होता. त्यामुळे त्याच्या हत्याकांडाशी या घटनेचे तार जुळले आहे.



मृतक वैभव पटेरिया

# मोर्शीच्या खेडमध्ये बिबट्याची दहशत

## नागरिकांमध्ये भितीचे वातावरण



**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.2 )** - मोर्शी तालुक्यातील खेड परिसरात बिबट्याचे दोन पिल्ले आढळून आल्याने ग्रामस्थ व शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. याबाबतच्या माहितीवरून वन परिक्षेत्र अधिकारी अमोल चौधरी यांच्या नेतृत्वाखाली वनविभागाच्या चमु बिबट्याचा मागोवा घेत आहे.

वनविभागाने जंगलात पोहोचून बिबट्याचा शोध सुरू केला. वनविभागाचे पथक घटनास्थळी शोध घेत आहे. विशेष म्हणजे गेल्या काही दिवसांपासून खेड गावाच्या उत्तरेकडील पेठ जंगलात बिबट्याचे दोन पिल्ले दिसल्यानंतर खेड सावदा रस्त्यावर राहणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये भिती निर्माण झाली आहे. शेतमजूर घाबरले असून, ते शेतात जाण्यास घाबरत आहेत. या मार्गाचा वापर करणारे दुचाकी वाहनचालक आपला मार्ग बदलून दुसरा मार्ग घेत असल्याचेही दिसून येत आहे. याबाबत सविस्तर माहिती देताना स्थानिक शेतकरी मांडकर यांनी सांगितले की, बिबट्याबद्दलच्या पूर्वीच्या अफवांवर विश्वास बसला नाही, मात्र आपण स्वत: आपल्या शेतातून खेडकडे परतत असताना खेड-सावदा रस्त्यालगत बिबट्याची दोन पिल्ले बसलेली दिसली. पिल्ले पाहून धक्काच बसल्याचे त्यांनी सांगितले, त्यानंतर सीताफळ महासंघ व मोर्शीचे जिल्हा समन्वयक दिनेश शर्मा यांच्याशी चर्चा केली. वनपरिक्षेत्र अधिकारी अमोल चौधरी यांच्याशीही दूरध्वनीवरून संपर्क साधण्यात आला.

### दोन बछड्यांसोबत शिवारात आढळला बिबट

शेतशिवार परिसरात दोन बछड्यासह बिबट शिवारात असल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मोर्शीचे वनपरिक्षेत्र अधिकारी अमोल चौधरी यांचा चमु घटनास्थळी दाखल झाला. सदर घटनेचा आढावा घेऊन परिसरातील नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे. त्याचबरोबर खेड गावांमध्ये मुनादी देऊन खेड ते सायवाडा रोडवर जागोजागी सुरक्षेच्या हेतूने फलक सुद्धा लावण्यात आले. सदर बिबट्या रात्री दहा वाजताच्या दरम्यान त्याच्या दोन बछड्यासह खेड गावातील अमीन उल्ला, रत्नाकर मांडेकर, व बऱ्याच शेतकऱ्यांना दिसून आला आहे. रात्री दरम्यान शेतामध्ये जात असताना टॉर्च काठी हातात घेऊन सुरक्षेच्या हेतूने शेतात जावे अशी माहिती वनविभागाच्या अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांना दिली.

# खिराडा येथे आज पासून भव्य शंकरपट

## लाखोंच्या बक्षिसांची लूट



**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी,( दि.2 )**- तालुक्यातील खिराडा येथे दि.3 ते दि 5 पर्यंत लक्ष्मी सुधीर अढाऊ यांच्या शेतात भव्य शंकरपटाचे आयोजन सातपुडा शंकरपाट समिती निमखेड बाजारच्या वतीने केले असून दरवर्षी भव्य शंकर पटाचे आयोजन समितीमार्फत करण्यात येते यावर्षी लाखो रुपयांच्या बक्षिसांची लूट करण्यात आली आहे.

या तीन दिवसीय शंकरपटाचे उद्घाटन दि.3 ला सामाजिक कार्यकर्ते विजय तिजारे पाटील यांच्या हस्ते असून कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आमदार गजानन लवटे राहणार असून प्रमुख उपस्थितीमध्ये सुधीर अढाऊ, पोलीस पाटील वैभव अढाऊ, निमखेड बाजार येथील पोलीस पाटील दिनेश तनपुरे, हिरापूर येथील पोलीस पाटील नरेंद्र घनमोडे, शिवा भाऊ चोरमले, आशिष शिंदे राहणार आहेत. हा शंकरपटात तीन गटात राहणार असून तीनही गटात लाखो रुपयांची बक्षीस ठेवण्यात आली असून या शंकरपाटाचे समालोचन गणेश पळशीकर हे पाहणार आहेत. शंकरपटला विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रातील तसेच मध्यप्रदेश येतील नामांकित बैल जोड्या भाग घेणार असून या शंकरपाटात जास्तीत जास्त संख्येने नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजन समितीच्या मार्फत करण्यात आले आहे.

# चुलत भावाच्या त्रासाला कंटाळून दिव्यांग तरुणाची आत्महत्या

## पोलिसात गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.2 )**- दिव्यांग तरुणाने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना सरमसपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली होती. गोकुल सुदाम भोरे असे मृताचे नाव आहे. याप्रकरणात मृताचे वडिल सुदाम नारायण भोरे (63, रा. बळेगाव) यांच्या तक्रारीवरून सरमसपुरा पोलिसांनी मुकबधिर मुलाला त्रास देऊन त्याला आत्महत्येस प्रवृत्त करणार्या चुलतभावाविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

तक्रारीनुसार, गोकुल भोरे हा मुकबधिर होता. तो अचलपूरातील जगदंबा विद्यालयात बीए प्रथम वर्षाला शिकत होता. तो हाताने इशारा करून घरातील सदस्यांशी बोलत होता. परंतू सन 2020 पासून चुलत भाऊ नागोराव पंजाबराव भोरे हा गोकुळला दिव्यांगपणावरून त्रास देत होता. 11 फेब्रुवारी 2023 रोजी सुदाम भोरे यांच्या पुतणीचे हरण येथे लग्न होते. त्यावेळी गोकुळ याला नागोराव भोरेने त्रास दिला. त्यामुळे तो रडत होता. त्याने आपल्या कुटुंबातील सदस्यांना इशारे करून घरी परत चलायला सांगितले. त्यावेळी गोकुळ हा फार दुखी होता. त्यानंतर सायंकाळी सुदाम भोरे हे घरी परतले असता, त्यांना गोकुळ हा देवघरातील फॅनला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. आरोपी नागोराव हा नेहमीच मुकबधिर गोकुळला त्रास देत असल्याने त्याने या त्रासाला कंटाळून अखेर आत्महत्या केली आहे, असे सुदाम भोरे यांनी 1 मार्च रोजी दिलेल्या तक्रारीत नमुद केले आहे. यावरून पोलिसांनी नागोराव भोरेविरुध्द आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या कलमान्वये गुन्हा नोंदविला.

# अल्पवयीन मुलावर चाकूने हल्ला

## दोन अल्पवयीन मुलांविरुद्ध गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.2 )** - शहरातील बसस्थानक रस्त्यावरील एका कॅन्टीनमध्ये दोन अल्पवयीन मुलांनी 15 वर्षांच्या मुलावर चाकूने प्राणघातक हल्ला केला. ही घटना 28 फेब्रुवारी रोजी रात्री 7.30 वाजता घडली. जखमी व्यक्तीचे नाव मनीष शंकर खंडारे (15, रा. बेलपुरा) असे आहे. ओम सोळंके यांच्या तक्रारीवरून सिटी कोतवाली पोलिसांनी दोन अल्पवयीन मुलांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जखमी मनीष 28 फेब्रुवारी रोजी सायंकाळी ओम सोळंके आणि एका मुलासह कॅन्टीनमध्ये आला होता. दोघांनीही उसाचा रस प्यायला आणि बोलू लागले. यावेळी दोन्ही आरोपी अल्पवयीन मुले तिथे पोहोचली. त्याने सिगारेट आणि चहा घेतला आणि ते मनीषशी मस्करी करू लागले. त्यावेळी तू माझी चेष्टा का करत आहेस ?, असे मनिषने म्हटले. त्यानंतर एका अल्पवयीन मुलाने चाकू काढून त्याच्या पोटात वार केला. ज्यामुळे पोटातून रक्तस्त्राव सुरू झाला. त्यानंतर सदर अल्पवयीन मुलाने इतरांना बोलावले आणि तेथून मोटारसायकलवरून पळून गेला. त्यानंतर ओम सोळंके आणि आणखी एका व्यक्तीने मनीषला इर्विन रुग्णालयात दाखल केले. पण मनीषची प्रकृती गंभीर झाल्यामुळे त्याला पीडीएमसी रुग्णालयात रेफर करण्यात आले. जिथे मनीषवर उपचार सुरू आहेत. ओम सोळंके यांच्या तक्रारीवरून सिटी कोतवाली पोलिसांनी दोन अल्पवयीन मुलांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# दुचाकीची बैलगाडीला धडक, एकाचा मृत्यू

**महासागर प्रतिनिधी**
**धारणी ( दि.2 )** - भरधाव दुचाकी बैलगाडीला धडकल्याने एकाचा मृत्यू झाला, तर दोघे जखमी झाले. या घटनेची तक्रार एएसआय माधवराव जांबु यांनी 1 मार्च रोजी धारणी पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी राजकुमार रामलाल भिलावेकर (30, रा. राणामालुर, ता. धारणी) यांच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

पोलिस तक्रारीनुसार, या घटनेच्या अनुषंगाने धारणी पोलिसांनी प्रथम आकस्मिक मृत्युची नोंद केली होती. या घटनेच्या तपासात पोलिसांना माहिती पडले की, आरोपी राजकुमार भिलावेकर हा त्याच्या दुचाकीवर मनिशा गणेश सावलकर आणि गणेश झनकलाल सावलकर (25) याच्यासोबत गावी जात होती. दरम्यान आरोपीने निष्काळजीपणाने दुचाकी चालवून बैलगाडीला धडक दिली. त्यामुळे ते तिघेही खाली पडले. या अपघातात गणेशचा मृत्यू झाला, तर मनिषा व राजेश गंभीर जखमी झाले. ही बाब माहिती पडली.

# आज विविध संघटनांचा शिवसन्मान महामोर्चा



## वाचाळवीर प्रशांत कोराडकर विरुध्द आक्रोश

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.2 )** - इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना प्रशांत कोराडकर याने जीवे मारण्याची धमकी दिली तसेच चर्चा करताना राष्ट्रमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांच्याविषयी अत्यंत अपमानास्पद भाषेत उल्लेख केला. अलीकडे राज्यभरात महापुरुषांबाबत सतत उलट सुलट बोलून महापुरुषांचा अपमान करण्याचा त्यांनी विडा उचलला आहे, असे सांगत महापुरुषांच्या संदर्भात गरळ ओकणाऱ्याविरोधात देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा. या मागणीसाठी अमरावती शहरात सोमवारी (ता. तीन) सकाळी 10 वाजता शिवसन्मान महामोर्चा काढला जाणार असल्याची माहिती मराठा सेवा संघाचे प्रदेश उपाध्यक्ष अरविंद गावंडे यांनी शनिवारी (ता. एक) पत्रपरिषदेत दिली. जिल्ह्यातील विविध सामाजिक संघटनांनी या शिवसन्मान महामोर्चाचे आयोजन केलेले आहे. सकाळी 10 वाजता पंचवटी चौक येथील डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेबदेशमुख यांच्या स्मारकाला अभिवादन करून मोर्चाला प्रारंभ होईल. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून मोर्चा जिल्हाकचेरीवर धडकणार आहे.

मोर्चात तब्बल 25 ते 30 हजार नागरिक सहभागी होणार असल्याचे प्रवीण मनोहर यांनी सांगितले. प्रशांत कोराडकर हा कुठे लपून बसलेला आहे हे शासनाला माहीत असतानाही त्याचाशोध घेतला जात नाही. इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना पोलीस सुरक्षा देण्याऐवजी कोराटकर यांच्या परिवाराला सुरक्षा दिली जात आहे. यासाठी मोर्चाच्या माध्यमातून बहुजनांचा आवाज बुलंद करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. इतिहासाची तोडमोड सातत्याने केली जात आहे. महाराष्ट्रात राहून सत्तेच्या लालसेपोटी आपली अस्मिता गहाण ठेवल्याचे प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रवक्ते जितू दुधाने यावेळी म्हणाले. पत्र परिषदेलामराठा सेवा संघाचे प्रदेश उपाध्यक्ष अरविंद गावंडे, प्रवीण मनोहर, ऑटो युनियनचे नितीन मोहोड, प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाप्रमुख छोटू महाराज वसु, बंटी रामटेके, राजेंद्र ठाकरे, जिजाऊ ब्रिगेडच्या मनाली तायडे, मैथिली पाटील, अजय नेते, अरबिंद गावंडे, अभिजीत देशमुख, गिरीश चौधरी, मिराज खान पठाण, महेश देशमुख, प्रशांत शिरभाते, सईद खान यांच्यासह विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

### बहुजन समाजाचे काही मंत्री पेशव्यांचे गुलाम!

सत्तेतील बहुजन समाजाचे आमदार, खासदार, मंत्र्यांनी अद्यापही या घटनेचा निषेध केला नाही, उदयनराजे, शिवेंद्रराजे हे सर्व पेशव्यांचे गुलाम झाले आहेत. भाजपच्या बहुजन नेत्यांनी मोर्चात सहभागी व्हावे, मोर्चात सहभागी न झाल्यास त्यांचा छुपा पाठिंबा असल्याचे सिद्ध होईल. या घटनेला माजी पालकमंत्री प्रवीण पोटे, खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्यासह सरकारचा पाठिंबा असल्याचा आरोप ऑटो युनियनचे नितीन मोहोड यावेळी केला.

### माजी मंत्री बच्चू कडू राहणार उपस्थित

इतिहासाची तोडमोड केल्या जाऊन सातत्याने खोटा इतिहास मांडण्याचा प्रकार राज्यात घडत आहे. त्या विरोधात निघणाऱ्या मोर्चाला प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष बच्चू कडू यांचा पाठिंबा असून ते स्वत: मोर्चात सहभागी होणार असल्याचे प्रहारचे जिल्हाप्रमुख छोटू महाराज वसू यांनी सांगितले

### देशद्रोहाचाच गुन्हा दाखल करा!

छत्रपती शिवाजी महाराज हे कुण्या एका जाती-धर्म, पंथाचे नव्हते तर तमाम महाराष्ट्राचे महापुरुष आहेत. त्यांचा अपमान करणाऱ्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा तसेच कुठल्याही महापुरुषाचा अपमान करणाऱ्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल व्हायला हवा, अशी मागणी यावेळी मैथिली पाटील यांनी केली.

# क्रिप्टो करन्सीतील गुतंवणुकीच्या नावावर 25 लाखांनी गंडविले

## परतवाडा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील घटना




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 2)** - क्रिप्टो करन्सीतील गुतंवणुकीच्या नावावर एका तरुणाची तब्बल 25 लाख 69 हजार 542 रुपयाने फसवणूक करण्यात आली. याप्रकरणात नचिकेत राजेंद्र देशपांडे (रा. वनश्री कॉलनी, कांडली, अचलपूर) यांच्या तक्रारीवरून परतवाडा पोलिस ठाण्यात 1 मार्च रोजी अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

तक्रारीनुसार, आरोपींनी नचिकेत देशपांडेंना इन्स्टाग्राम टेलीग्राम ॲपवर सांधून क्रिप्टो करन्सीमध्ये गुंतवणूक करण्यास सांगितले होते. त्यानुसार नचिकेत यांनी ओकेएक्स बीटगेट या प्लॅटफार्मचा वापर करून क्रिप्टो करन्सी खरेदी केली.

त्यानंतर अज्ञात आरोपींनी जास्त मोबदल्याचे आमिष दाखवून सदरचे क्रिप्टो करन्सी (युएसडीटी) हे स्वताऱ्च्या वॉलेट ॲड्रेसवर ट्रॉन्सफर करून नचिकेत देशपांडेंची 25 लाख 69 हजार 542 रुपयाने फसवणूक केली. असे नचिकेत देशपांडेंनी परतवाडा ठाण्यात दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# पशुधन घटल्याने शेणखत मिळणे झाले दुरापास्त

## वाढत्या यांत्रिकीकरणाचा परिणाम

**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट,( दि.2 )** – खरीप हंगामाची पूर्वतयारी करताना शेतकऱ्यांनी शेती मशागतीची कामे सुरू केली. दरम्यान यंत्राद्वारे कामांना पसंती दिली जात आहे. त्यामुळे मागील काही वर्षात पशुधन मोठ्या प्रमाणात घटले. त्यातच आता रासायनिक खताचे दर गगनाला भिडले आहेत. पशुधन घटल्याने शेतीला पोषक ठरणारा शेणखत मिळणे कठीण झाल्याचे चित्र तालुक्यात पहावयास मिळत आहे.

तालुक्यातील पशुधन कमी झाल्याने शेतीमध्ये शेणखताचा वापर कमी झाला. परिणामी उत्पादनात घट येत असल्याचे दिसून येत आहे. तर रासायनिक खताच्या अती वापरामुळे जमिनीची पोत खालावत आहे. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात पशुधन असायचे. परंतु पशुधनावर होणारा खर्च व त्यातून मिळणारे उत्पन्न यात तोटा होत असल्याने तर काही शेतकऱ्यांनी आर्थिक संकटामुळे पशुधनाची केलेली विक्री यामुळे शेणखताचे प्रमाण मात्र कमी झालेले आहे.

पूर्वीच्या काळी भरघोस मिळणारे शेणखत आता मात्र, दुरापास्त झालेले आहे. शेणखताच्या वापरामुळे शेतीची पोत सुधारून दर्जा वाढतो.

भरघोस उत्पादनासाठी शेणखत फायदेशीरच आहे. या खतामुळे रासायनिक खताचा वापर कमी प्रमाणात होत होता. त्यामुळे मानवी आरोग्यावर विशेष परिणाम दिसून येत नव्हता. परंतु पशुधनाच्या कमतरतेमुळे शेतकऱ्यांना नाईलाज रासायनिक खताचा वापर करावा लागत आहे.



### मानवी आरोग्य धोक्यात

मानवी आरोग्यासाठी शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीकडे वळण्याची गरज आहे. रासायनिक खताचा वाढलेला वापर, उत्पादन घेण्याची स्पर्धा कीटकनाशकांचा अतिवापर त्यामुळे मानवी आरोग्य धोक्यात येत आहे. शेतकऱ्यांनी रासायनिक खताचा वापर न करता माती परीक्षण करून जमिनीला कोणते घटक आवश्यक आहेत. ती मात्रा देण्याची गरज आहे.



### अशी सुधारेल शेतीची पोत

शेणखत पारंपरिक सेंद्रिय आहे. शेतकऱ्यांना ते शेतात उपलब्ध होऊ शकते. जनावरांच्या गोठ्यातील शेणामध्ये जनावराचे मूत्र आणि अर्धवट खाऊन टाकलेल्या चाऱ्याचे अवशेषही असतात. गोठ्याच्या कडेला माती टाकून त्यात जनावरांचे मूत्र सोपून घेता येते. ती माती जर शेणखताच्या खड्यात टाकली तर शेताची पोत सुधारते. सर्वसाधारणपणे चांगल्या कुजलेल्या शेणखतात 0.4 टक्के नत्र. 0.15 टक्के स्फुरद आणि 0.50 टक्के पालाश असते. यामुळे जमिनीची सुपीकता टिकवून पिकाचे भरघोस उत्पादन वाढविण्यासाठी शेणखतासारख्या सेंद्रिय खताचा वापर करणे आवश्यक आहे.

# शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदली प्रक्रियेला 10 मार्चपासून सुरुवात

## शिक्षण व ग्रामविकास मंत्र्यांनी घेतली दखल

### प्रहारने केली होती मागणी





**महासागर प्रतिनिधी**

**चिखलदरा, ( दि.2 )** – विविध कारणांमुळे रखडलेली राज्यातील शिक्षकांची आंतरजिल्हा बदली प्रक्रिया 10 मार्चपासून सुरू होत आहे. यासंदर्भात प्रहार शिक्षक संघटनेने वस्तुस्थिती मांडून शासनाकडे मागणी केली होती. राज्याचे शिक्षण मंत्री दादा भुसे आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी त्याची दखल घेऊन 10 मार्चपासून 6 एप्रिलपर्यंत ही बदली प्रक्रिया राबविण्याचे आदेश दिले आहेत. राज्यातील 8 हजार शिक्षकांना त्याचा लाभ होणार आहे. स्वाभाविकच या शिक्षकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

2017 सालापासून शासनाने जिल्हा परिषद शिक्षकांच्या ऑनलाईन आंतर जिल्हा बदलीचे सहा टप्पे राबविले होते. त्यामुळे राज्यातील 15 हजार शिक्षक त्यांच्या स्व जिल्ह्यात स्थिरावले आहेत. ऑनलाइन बदली प्रक्रिया राबविल्याने आर्थिक गैरव्यवहारांना सुद्धा आळा बसला असून बदली प्रक्रियेतील भ्रष्टाचार संपुष्टात आला आहे. त्यामुळे हेच धोरण कायम राखून आंतरजिल्हा बदली प्रक्रियेचा रखडलेला सातवा टप्पा ऑनलाईन पद्धतीने तात्काळ राबविण्यात यावा, अशी मागणी प्रहार शिक्षक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष महेश पवार यांनी सरकारकडे केली होती.

याबाबत संघटनेच्या वतीने वारंवार पाठपुरावाही करण्यात आला. परंतु राज्याच्या शिक्षण मंत्र्यांनी बदली धोरणासंदर्भात काढलेल्या शासन आदेशामुळे राज्यातील शिक्षकांमध्ये या संदर्भाने अनिश्चितता निर्माण झाली होती. आंतर जिल्हा बदलांसंदर्भात योग्य निर्णय घेण्याची मागणी प्रहार संघटनेने शिक्षण मंत्री दादा भुसे व ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांना निवेदनाद्वारे केली होती. अखेर या मागणीची दखल शासन स्तरावर घेण्यात आली आहे. ग्रामविकास विभागाने 28 फेब्रुवारी रोजी आदेश काढून आंतरजिल्हा बदली प्रक्रियेचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार 10 मार्च ते 6 एप्रिल दरम्यान आंतरजिल्हा बदली प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. या आंतर जिल्हा बदली प्रक्रियेमुळे अनेक वर्षांपासून प्रतीक्षा करीत असलेल्या आठ हजार शिक्षकांना आपल्या जिल्ह्यात जाता येणार आहे.

बदली प्रक्रियेच्या कार्यक्रमानुसार 10 मार्चपर्यंत शिक्षकांची माहिती पोर्टलवर अद्ययावत करण्यात येणार आहे. 11 ते 13 मार्च पर्यंत रिक्त पदांची माहिती पोर्टलवर नोंदविली जाईल. 14 ते 20 मार्च या कालावधीत ऑनलाइन अर्ज सादर करता येणार आहे. 21 ते 25 मार्च दरम्यान अर्जांची पडताळणी होईल. 26 व 27 मार्चला न्यायालयीन प्रकरणे व विभागीय स्तरावरील अपील निकाली काढली जातील. 28 मार्च ते 6 एप्रिल दरम्यान प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. शासनाने ऑनलाईन बदली धोरण कायम ठेवून टप्पा क्रमांक सात राबविण्याचे आदेश दिले. प्रहार संघटनेच्या सततच्या पाठपुराव्यामुळे हे शक्य झाल्याची प्रतिक्रिया देत शिक्षकांनी याबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

# लोणी येथे राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा

## केशवराव क्षिरसागर विद्यालयात आयोजन



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड ( दि.2 )** – वरुडच्या जागृत नवयुवक शिक्षण संस्थेद्वारा संचालित लोणी येथील स्व. केशवरावजी क्षीरसागर जागृत विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. यावेळी एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भारतरत्न डॉ. सी. व्ही. रमन यांनी केलेल्या संशोधन कार्याच्या सन्मानार्थ हा दिवस साजरा करण्यात येतो. त्यांच्या प्रतिमेचे पूजन करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नीळकंठ नेरकर होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून श्रीमती रंजना काळकर, चेतन तडस, किर्ती पाचघरे उपस्थित होते. प्रमुख वक्त्या म्हणून वैशाली लाड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. राष्ट्रीय विज्ञान दिनाची संकल्पना विशद करून भारतरत्न डॉ. सी. व्ही. रमण यांच्या संशोधन कार्याविषयीची माहिती त्यांनी रोचक शब्दात देत विद्यार्थ्यांना प्रेरित केले. त्यानंतर रमण विज्ञान केंद्र नागपूर द्वारा प्रसारित करण्यात आलेल्या वैज्ञानिक स्लाईड शोचे विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले. याप्रसंगी वैज्ञानिक विषयावर विविध प्रश्न विचारले. त्याला वैशाली लाड यांनी समर्पक उत्तरे दिलीत.

आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरिता घेण्यात येणार्या परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थी श्रावणी प्रवीण नेरकर, नयना प्रदीप खेरडे, नैतिक विनोद झाडे, आश्विन वसंत राऊत, वैष्णवी अमोल नेरकर, यथार्थ किशोर क्षीरसागर, वेदांत प्रफुल पापडकर, कृष्णाली मोहन पाचघरे, श्रावणी दिलीप कापसे यांचे कौतूक करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक साहेबराव पेठे, पी. टी. मुंदाने, अमित देशमुख, दीपक दुपारे, अरविंद देशमुख, सुरेश उईके, अनिल पोहरकर, अर्चना पाटील यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.




# डॉ.निलेश तारे यांच्या मार्गदर्शनात 5 विद्यार्थ्यांना आचार्य पदवी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती ( दि.2 )** – इंग्रजी साहित्य या विषयातील तज्ञ डॉ. निलेश तारे यांच्या मार्गदर्शनात पाच विद्यार्थ्यांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची आचार्य पदवी प्राप्त केली आहे. त्यांना नुकत्याच पार पडलेल्या विद्यापीठाच्या 41 व्या दीक्षांत समारंभात आचार्य पदवी बहाल करून सन्मानित करण्यात आले. डॉ. निलेश तारे यांच्या मार्गदर्शनात आचार्य पदवीसाठी डॉ. गिरीश कुळकर्णी, डॉ. पिंपळकर, राधाकृष्ण मूर्ती, रोहित मडघे व डॉ. घनश्याम बेलसरे यांनी विद्यापीठात इंग्रजी साहित्य या विषयावर शोध प्रबंध सादर केला होता. डॉ निलेश तारे यांचे इंग्रजी साहित्यात संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय योगदान आहे. त्यासाठी त्यांना रवींद्रनाथ टागोर इंटरनॅशनल अवार्ड देऊन नुकतेच गौरविण्यातही आले आहे. निलेश तारे यांच्यासह त्यांच्या मार्गदर्शनात आचार्य पदवी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

# मेहेरबाबा जयंती निमित्त भक्तिसंगीत

**चांदूरबाजार** – तालुक्यातील बेलोरा येथील भाविक विनोद मधूरकर यांच्या निवासस्थानी अवतार मेहेरबाबा जयंती कार्यक्रम नुकताच पार पडला. प्रामुख्याने संत गजानन महाराज भजनी मंडळाचा भक्तिसंगीत कार्यक्रम घेण्यात आला. दुरदर्शन कलावंत सोपान देव यांनी दर्जेदार गीते सादर केली. मंडळातील इतर सदस्यांनी भजने सादर केली. प्रफुल्ल चौधरी, गोपाल डोंगरे, कंकाळे, भागवत बारबुद्धे, विनोद मथूरकर यांनी गीते सादर केली. तसेच गावात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

# बाबा कॉलेज ऑफ नर्सिंगच्या विद्यार्थ्यांचा शपथविधी सोहळा

**दर्यापूर** – स्थानिक बाबा कॉलेज ऑफ नर्सिंगच्या जीएनएममधील प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी निस्वार्थ भावनेने रुग्णांची सेवा करणार असल्याची शपथ घेतली. वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात नर्स यांची महत्वपूर्ण भूमिका असल्याचे मत डॉक्टरांनी व्यक्त केले. यावेळी अध्यक्ष डॉ. सचिन नागे, सचिव कपिल पोटे, डॉ. मनीष हुतके गुंजन गुल्हाने, ॠजुजा मुगल व पालक बहुसंख्येने उपस्थित होते.

# रेवती राऊत यांची महसूल सहाय्यक पदावर निवड

## प्रतिकुलतेवर मात करित एमपीएससीत यश



**महासागर प्रतिनिधी**

**हिवरखेड,( दि.2 )** – येथून तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या बेलोना येथील रेवती हरिभाऊ राऊत यांनी परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण केली आहे. त्यांची महसूल सहाय्यक पदावर निवड झाली आहे. रेवतीचा हा प्रवास प्रेरणादायी ठरला आहे. आर्थिकदृष्ट्या प्रतिकूल परिस्थितीत वाढलेल्या रेवतीने कठीण परिस्थितीला न जुमानता अपार मेहनतीने अभ्यास केला आणि आपल्या जिद्दीच्या जोरावर सरकारी नोकरी मिळवण्याचे स्वप्न पूर्ण केले.

मुलीने सरकारी अधिकारी व्हावे हे तिच्या वडिलांचे स्वप्न होते. रेवतीच्या यशाने तिच्या कुटुंबाचे स्वप्न साकार झाले. आपल्या भावना व्यक्त करताना तिच्या वडिलांनी सांगितले की, तिने अहोरात्र अभ्यास केला, कधीही हार मानली नाही आणि आज तिने आम्हाला अभिमान वाटावा असे यश मिळवले आहे. बेलोना गावाने तिच्या या यशाचे जल्लोषात स्वागत केले. अनेक तरुणींना तिच्या यशाने नवा आत्मविश्वास मिळाला आहे. आपल्या यशाबद्दल बोलताना रेवती म्हणाली, हे यश केवळ माझे नाही, तर माझ्या आई-वडिलांच्या त्यागाचे आणि संपूर्ण गावाच्या आशीर्वादांचे फळ आहे. मी प्रामाणिकपणे आणि निष्ठेने लोकांची सेवा करेन. रेवतीचा हा प्रवास ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला आहे. मेहनत आणि दृढ इच्छाशक्तीच्या जोरावर कोणतीही स्वप्ने सत्यात उतरू शकतात, हे तिने दाखवून दिले आहे.

# शेतकरी कन्या शुभांगी होलेचे नेट परिक्षेत यश



**महासागर प्रतिनिधी**

**हिवरखेड,( दि.2 )** – हिवरखेड येथील प्रतिष्ठित शेतकरी साहेबराव होले यांची कन्या कु. शुभांगी साहेबराव होले (देवघरे) हिने अत्यंत परिश्रमाने आणि चिकाटीने तयारी करुन राष्ट्रीय पात्रता परिक्षा अर्थात नेटची परिक्षा उत्तीर्ण केली आहे. त्यांच्या या यशाचे गावात कौतूक होत आहे.

शुभांगी होले यांनी पदवी शिक्षणापासूनच सेट (राज्य पात्रता परीक्षा) आणि नेट (राष्ट्रीय पात्रता परीक्षा) परीक्षेची तयारी केली. अनेकदा ती यशाच्या जवळ जाऊनही तिला अपयश मिळाले. तरीसुद्धा खचून न जाता तिने प्रामाणिकपणे सतत प्रयत्न करून डिसेंबर 2024 ची नेटची परिक्षा दिली आणि अखेर त्यात तिने यश संपादन केले व गावाला लौकिक मिळवून दिला आहे. विशेष म्हणजे लग्न झाल्यानंतर शुभांगाने आपल्या प्रयत्नांत खंड पडू दिला नाही. त्यासाठी तिला पती आणि सासरची मंडळी तसेच आईवडील, भाऊ- बहिणींनी प्रोत्साहित केले. या यशाचे श्रेय ती पती देवघरे तसेच आप्त-स्वकीय, मित्र परिवार तसेच गुरूजन यांना दिले आहे. या यशाबद्दल प्रा. सुभाष पारीसे, प्रा. अमोल इंगळे, प्रा. मेघा सोमकुवर, जितेंद्र फुटाणे यांनी तिचे अभिनंदन केले आहे.

# राजूरा-मासोद रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे

## गिरीश चौधरी यांचा आरोप, आंदोलनाचा इशारा

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी,( दि.2 )** – पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत विद्यापीठ रोड अमरावती परिसरातील राजूरा नाका ते मासोद रोडचे बांधकाम करण्यात येत असून हे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्र्राचा आरोप युवा जानता संघटनेचे संस्थापक गिरीश चौधरी यांनी केला आहे. रस्त्याच्या कामाची गुणवत्ता वाढविण्यात आली नाही, तर आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

काम करताना सुरुवातीला या रस्त्याचे योग्य प्रकारे खोदकाम व त्यानंतर दबाई करण्यात आली नाही. गिट्टी उखडत चालली आहे. काम सुरू असताना रस्त्यावर पुरेशा प्रमाणात पाणी टाकले जात नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. गुणवत्ता राखला जात नसल्याने हा रस्ता काही दिवसांतच खराब होवून शासनाचा पैसा वाया जाईल, असा दावा चौधरी यांनी केला आहे.



या रस्त्यासंदर्भात प्रतप्रधान ग्राम सडक योजनेचे कार्यकारी अभियंता जाधव व संबधित सर्व अधिकार्यांना वस्तूस्थिती लक्षात आणून दिल्याचे चौधरी यांनी म्हटले आहे. या कामामुळे परिसरात धुळ उडत असल्याने मासोद येथे अनेक रहिवाशांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. धुळीमुळे रस्ता दिसत नसल्याने अपघातांची शक्यता नाकारता येत नाही. वरिष्ठ अधिकार्यांनी लक्ष घालून रस्त्याचे काम दर्जेदार व्हावे यावर भर देण्याची मागणी गिरीश चौधरी यांनी केली आहे.

# पं. स. आमसभेत आमदारांकडून अधिकाऱ्यांची कानउघाडणी

## उपकार्यकारी अभियंत्याला नोटिस | विविध विभागांचा घेतला आढावा

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूरबाजार, ( दि. 2 )** – चांदूर बाजार पंचायत समितीच्या वार्षिक आमसभेत आमदार प्रविण तायडे यांनी विविध विभागाच्या कामकाजाचा आढावा घेताना, कामकाजात हयगय करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची हयगय केली. सर्वसामान्य जनतेची अडवणूक करुन कामचुकारपणा करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची त्यांनी कानउघाडणी केली. अशा कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यास मागेपुढे पाहीले जाणार नाही, अशी तंबीच त्यांनी दिली.

चांदूरबाजार पंचायत समितीची वार्षिक आमसभा आ. प्रवीण तायडे यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी पंचायत समितीच्या प्रांगणात पार पडली. यावेळी मागील आमसभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे तसेच अध्यक्ष यांच्या परवानगीने आलेल्या विषयांवर चर्चा करण्यात आली. आमसभेच्या सुरुवातीला पाणी पुरवठा आणि टंचाईबाबत अधिकारी आणि ग्रामस्थ यांनी आपल्या समस्या सांगितल्या. पांदण रस्त्यांबाबत देखील अनेक तक्रारी आल्या. प्रवीण तायडे यांनी यासंदर्भात विशेष सभा घेणार असल्याचे सांगितले. चर्चेदरम्यान ग्रामविकास अधिकारी यांना तायडे यांनी धारेवर धरले. शिरजगाव बंड येथील ग्रामविकास अधिकारी यांना कामात अनियमितता असल्याबद्दल त्यांनी सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या.





तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अधिकारी या आमसभेला उपस्थिती नसल्याने, त्यांनी कार्यकारी अभियंता यांना संबंधित अभियंता यांच्यावर कारवाई करण्याचे निर्देश दिले. उशिरा आलेले अभियंता ललित बोबडे यांना पत्र मिळाले नसल्याचे लेखी मागण्यात आले.

त्यानंतर मृदा व जलसंधारण विभागाचा देखील त्यांनी आढावा घेतला. काही प्रश्नांची उत्तरे अधिकारी देऊ न शकल्याने त्यांना आमदारांच्या रोषाचा सामना करावा लागला.

शिरजगाव कसबा येथील कोल्हापुरी बंधाराबाबत सरपंच प्रवीण खेरडे यांनी तक्रार करून देखील काहीच चौकशी न केल्यामुळे अभियंता मडावी यांच्यावर शिस्तभंगाच्या कारवाईची मागणी खेरडे यांनी केली. आमसभेत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंता पराग शेटे यांना भ्रमणध्वनी वरून कॉल करून जनतेच्या समस्या सोडवली गेली. आरोग्य विभागाकडून उडवाउडवीची उत्तरे दिली गेली. त्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली. जिल्हा परिषद बांधकाम विभाग, कृषी विभाग, पशुसंवर्धन विभाग, बांधकाम विभागाचा आढावा यावेळी घेण्यात आला. संचालन ईगल मॅडम, प्रास्ताविक गटविकास अधिकारी नारायण आमझरे तर विषय सूची वाचन विस्तार अधिकारी निखिल नागे यांनी केले. आमसभेला प्रमोद कोरडे, तालुका अध्यक्ष मुरली माकोडे, विलास तायवाडे, आनंद अहिर, जयश्री पंडगरे, अतुल दारोकर यांच्यासह भाजप पदाधिकारी, विविध गावचे सरपंच आणि गावकरी उपस्थित होते.

# मुलांमध्ये छत्तीसगढ तर मुलींमध्ये महाराष्ट्राला विजेतेपद




## 46 वी वरिष्ठ राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धा

### विभागीय क्रीडा संकुलात रंगले सामने

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.2 )**– भारतीय सॉफ्टबॉल असोशिएशन, महाराष्ट्र राज्य सॉफ्टबॉँल असोशिएशन आणि अमरावती जिल्हा सॉफ्टबॉँल असोशिएशन यांच्या संयुक्त विद्यमानाने विभागीय क्रीडा संकुलात पार पडलेल्या 46 व्या वरिष्ट गट राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धेत मुलांमध्ये छत्तीसगढ संघाने तर मुलींमध्ये महाराष्ट्राच्या संघाने विजेतेपद पटकावले. या स्पर्धेत संपूर्ण भारतातून 25 महिलांचे व 29 पुरुषांचे संघ सहभागी झाले होते.

पुरुषांचा अंतीम सामना छत्तीसगढ विरुद्ध मध्य प्रदेश या संघांमध्ये झाला. त्यात छत्तीसगढ 5 गुणानी विजयी झाला. मुलींचा अंतीम सामना महाराष्ट्र विरुद्ध पंजाब या संघांदरम्यान झाला. त्यात महाराष्ट्राने पंजाबचा 5 गुणांनी पराभव करुन विजेतेपद प्राप्त केले. विजेत्या संघांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र सॉफ्ट संघटनेचे वाय. जे. अशर, उपाध्यक्ष रूपलाल शर्मा, डॉ. प्रदीप तळवेलकर, कोषळध्यक्ष संतोष चव्हाण, सहसचिव ओ. पी. शर्मा, वासिम राजा खान, माजी सचिव एल. आर. मौर्य, श्रीकांत थोरात, हरियाणाचे सचिव सतबीरसिंग, राजस्थानचे राजबीरसिंग, पंजाबचे सुखराम, हिरालाल ठक्कर, मधुवती पारगावकर, भारतीय रेफ्री कमिटीचे मुकुल देशपांडे, संगीता येवतीकर, प्रतिक डुकरे, दर्शन पंडित, पंकज गुल्हाने, डॉ. अमित गावंडे, सचिन पाटणे, यशपाल गुडधे, संतोष सावरकर, मोहन गौरखेडे, डॉ. विक्रांत गौतम, राहुल खेडकर, संतोष ठाकरे, सचिन वानखडे उपस्थित होते. बक्षिस वितरण स्पर्धेच्या यशस्वितेसाठी विकास येवतीकर, अभिजीत इंगोले, प्रतिक डुकरे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्याक्रमचे संचालन डॉ. सुरजसिंग येवतीकर यांनी तर आभार प्रदर्शन श्रीमती रुपाली इंगोले (ढोणे) यांनी केले.